| | |
|---|---|
| MHOS040011352026 | **रे.दि.मु. नं. १८२/२०२६**<br>**भैरुनाथ करंडे वि. नाना करंडे व इतर** |

<u>निशाणी क्रमांक १५ खाली आदेश पारीत</u>

०१. प्रस्तुत अर्ज हा वादीने **दिवाणी प्रक्रिया संहीता, १९०८ चा आदेश ६ नियम १७** प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादीने सदर अर्जामध्ये कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटणी होऊन पृथक ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल करतेवेळी मौजे मसला–खुर्द, ता. तुळजापुर, जि. धाराशिव येथील ग्रामपंचायत मिळकत अनुक्रमांक २६४, ज्याचा मिळकत क्रमांक २५८ क्षेत्र पुर्व–पश्चिम ४१ फुट व दक्षिण–उत्तर १८ फुट ही घरजागा दाव्यात समाविष्ट करणे राहुन गेले आहे. दावा हा वाटपासाठी असल्याने सदरची मिळकत ही वडिलोपार्जीत मिळकत असल्याने ती दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीस सदर तथ्यांनुसार अनुषंगिक दुरुस्ती करुन वर नमुद तथ्ये दाव्याच्या शिर्षकामध्ये, परिच्छेद क्र. १ (उ), ७ (अ), १३ (अ) व प्रार्थनेच्या रकान्यातील ब (१) हा वाढविणे आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याच्या अंतीम निकालासाठी मदतच होणार आहे. करीता प्रस्तावित दुरुस्ती होणे आवश्यक असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

०३. प्रतिवादींनी अर्जास तीव्र विरोध दर्शवुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणी निष्कर्षास अनुसरून उत्तर मी निम्नप्रकारे देत आहे.

| **अनु.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरूस्ती आवश्यक आहे काय? | होय |
| २. | कोणता आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**का र ण मि मां सा**

**मुद्दे क्रमांक १ ते २ करीता–**

०५. मुळ दावा, प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावर उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

०६. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे असा युक्तीवाद केला की सदरची दुरूस्ती ही दावा गुणदोषावर निकाली होण्यासाठी आवश्यक आहे की जो दिवाणी प्रक्रीया संहीता कलम हुकुम ६, नियम १७ चा मुळे उद्देश आहे. सदरची दुरूस्ती कायद्याचे व न्यायाचे अंतिम दृष्टीने आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्यामध्ये कुठलाही आमुलाग्र बदल होत नाही. प्रस्तावित दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असुन ती अर्ज गुणवत्तेवर निकाली काढणेसाठी आवश्यक आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा. याउलट प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादीने प्रस्तुत अर्ज उशीराने दिलेला असल्याने तो अर्ज नामंजुर करावा.

०७. अर्जातील कथन, अभिलेखावरील सर्व कागदपत्रे यांचे अवलोकन केले.

प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी असल्याने हिंदु मिताक्षरी कायद्यानुसार हिंदु एकत्र कुटुंबाच्या सर्व मिळकत ह्या दाव्यात समाविष्ट करणे बंधनकारक आहे. त्यामुळे वादीस त्याअनुषंगाने दाव्यामध्ये मौजे मसला–खुर्द, ता. तुळजापुर, जि. धाराशिव येथील ग्रामपंचायत मिळकत अनुक्रमांक २६४, ज्याचा मिळकत क्रमांक २५८ क्षेत्र पुर्व–पश्चिम ४१ फुट व दक्षिण–उत्तर १८ फुट ही घरजागा समाविष्ट करावयाची आहे. सदर मिळकत दाव्यात समाविष्ट केल्यामुळे दाव्याचे मुल्यांकन निश्चीतपणे वाढणार आहे. परिणामतः त्या अनुषंगाने तथ्ये व प्रार्थना दाव्यात समाविष्ट करावयाची आहे. दावा हा स्थावर मिळकतीसंबंधी असल्यामुळे त्यामध्ये पक्षकारांचे मौल्यवान हितसंबंध गुंतलेले आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची व किरकोळ आहे. प्रस्तावित दुरूस्ती केल्यामुळे कोणाचे काहीही नुकसान होणार नाही. सदरची दुरूस्ती हे खरेखुरे वादप्रश्न निकाली काढणेसाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तावित दुरूस्ती अर्ज गुणदोषावरील निकालाकरीता आवश्यक आहे. सबब वरील चर्चेस अनुषंगून न्यायाचे दृष्टीने वादीचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. करीता मी खालिल आदेश पारित करत आहे.

## <u>आ दे श</u>

**०१.** अर्ज नि.क्र. १५ मंजुर करण्यात येतो.

**०२.** वादीने अर्ज नि.क्र. १५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती दाव्यात करुन दुरुस्त दावा प्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करावी.

**०३.** वरील आदेशाप्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येतो.

**दिनांकः–०४/०७/२०२६.** **( अ.रा. मुक्कनवार )**

**ठिकाण – तुळजापुर.** **३ रे सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,**

**तुळजापूर.**

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

Name of Stenographer – R.M. Kokare, Stenographer Gr. III

Court -3rd Jt.CJJD & JMFC Tuljapur

Date-04.07.2026

Order signed by the Presiding Officer on-04.07.2026

Order uploaded on-04.07.2026